**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर**
**नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५**
**मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर**
**दुरध्वनी – ०२५२५ - २५११००**
**E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com**

**प्रेसनोट क्र. ९६ दिनांक २४/११/२०२६**

# बनावट कॉल सेंटरद्वारे परदेशी नागरिकांची फसवणूक करणारी टोळी पालघर पोलिसांकडून जेरबंद;

## ७ आरोपी अटकेत, २१,८३,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

मनोर पोलीस ठाणे हद्दीतील मौजे भोपोली (ता. विक्रमगड) येथील एका बंगल्यात बनावट कॉल सेंटर चालवून परदेशी नागरिकांची फसवणूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. पोलीस अधीक्षक श्री. यतिश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि श्री. प्रदिप पाटील यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २४/११/२०२६ रोजी रात्री ००.०५ वाजता छापा टाकला असता तेथे ७ इसम मिळून आले. सदर इसम अमेरिकेतील नागरिकांना त्यांच्या मोबाईल/लॅपटॉपमध्ये व्हायरस असल्याचे मेसेज पाठवुन ते बँक खात्यातील पैसे सुरक्षित करण्याच्या बहाण्याने त्यांना गिफ्ट कार्ड खरेदी करायला लावत आणि त्या कार्डचे नंबर रिडीम करत. उरलेली रक्कम हवालामार्फत मिळवत असल्याचे उघड झाले आहे.

सदर छाप्यात ७ लॅपटॉप, १४ मोबाईल, ४ हेडफोन, १ राउटर, फॉर्च्युनर कार (MH48/S-1919) व रॉयल एन्फिल्ड मोटारसायकल (MH47/BX-1810) असा एकूण २१,८३,४००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर इसमांविरुद्ध मनोर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २४१/२०२६ बीएनएस २०२३ चे कलम ३१८ (२), ३१९ (२), ३३६ ३), ३४० (२), ६१ (२) सह माहिती तंत्रज्ञान कायदा सन २००० चे कलम ६६ (डी), ६६ (सी) प्रमाणे दि.२४/११/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोनि/प्रदिप पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर करीत आहेत.

**अटक आरोपींचे नावे** :- १) विनोद राय, वय ३६ वर्षे, रा. विरार, २) शाहिद खान, वय ३० वर्षे, रा. नालासोपारा ३) आश्विन झावरे वय २५ वर्षे, रा. डहाणु, ४) शाहीद खान, वय २६ वर्षे, रा. मिरा रोड, ५) अवलेश शेख, वय २२ वर्षे, रा. नालासोपारा, ६) सईद ख्वाजा, वय ५५ वर्षे, रा. मिरा रोड, ७) सागर सावे, वय ४० वर्षे, रा. विरार.

सदरची कारवाई ही श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/प्रदिप पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, सपोनि/योगेश शिंदे, पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई, पोउपनि/गोरखनाथ राठोड, श्रेपोउपनि/राजेश वाघ, मसफौ/आरती पाटील, पोहवा/दिपक राऊत, पोहवा/संदिप सुर्यवंशी, पोहवा/संदिप सरदार, पोहवा/भगवान आव्हाड, पोहवा/राकेश पाटील, पोहवा/कैलास पाटील, पोहवा/नरेंद्र पाटील, पोअंम/मयुर पाटील, पोअंम/महेश अवतार, पोअं/नरेश घाटाळ, पोअं/महेंद्र चौधरी सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर तसेच पोउपनि/समिर भोसले, पोअंम/रामदास दुगेष्ट, नेमणुक सायबर पोलीस ठाणे, पालघर यांनी केलेली आहे.